# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्र. रामाआ-नाशिक/तक्रार क्र :६३५/२०२२/नाशिक**

| तक्रारदार | प्रतिवादी |
|---|---|
| श्री. विठोबा लच्छिराम द्यानद्यान,<br>रा. स. नं.१९६, प्लॉट नं. १०५/५, जे.डी. स्टील, श्रमिक नगर, नाशिक,ता.जि.नाशिक. | नायब तहसिलदार,<br>उपविभागीय अधिकारी मालेगांव यांचे कार्यालय, मालेगांव, ता.मालेगांव,जि. नाशिक. |

**सुनावणी दिनांक २३/०२/२०२४**

तक्रारदार यांनी दिनांक २६/१२/२०२२ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये दिनांक २३/०२/२०२४ रोजी आयोजित सुनावणीसाठी तक्रारदार आणि संबंधित जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

२) तक्रारदार यांनी दिनांक २६/१२/२०२२ रोजीच्या तक्रार अर्जात असे नमुद केले आहे की, दि.०८/११/२०२२ रोजीच्या माहिती अर्जास अनुसरुन मुदतीत माहिती देण्यात आली नाही. दि. ०८/११/२०२२ च्या माहिती अर्जान्वये टोकडे येथे फेब्रुवारी २०२२ या महिन्यात अवैध पुरुष उत्खन्न प्रकरणी केलेल्या कारवाईची माहिती मागितलेली होती.

३) सुनावणीवेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असे स्पष्ट केले की, तक्रारदार यांच्या दि. ०८/०१/२०२२ रोजीच्या माहिती अर्ज दि. १४/१२/२०२२ अन्वये तहसिल कार्यालयाकडे हस्तांतर केल्याचे दिसून येते.

४) सुनावणीदरम्यानचा युक्तीवाद व प्रस्तुत प्रकरणी आयोगास सादर केलेले अभिलेख विचारात घेता, जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांचे माहिती अर्ज संबंधित कार्यालयाकडे हस्तांतरीत केलेले आहे.तसे तक्रारदाराला कळविलेले आहे. जन माहिती अधिकारी यांची कार्यवाही योग्य असल्याने सदरची तक्रार पुढील चौकशी योग्य नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत तक्रार क्रमांक ६३५/२०२२/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

जावक क्र ओ-२८०८ 04 OCT 2024